सदैव तत्पर, सदैव मदतीस

Tel :- 022 22620453
E mail ID - depzone1-mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**
**Dy. Commissioner of Police, Zone 1, Mumbai**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१

जा.क्र १०२८/पोउआ/परि१/वा./२०२६ दिनांक - ०४/०५/२०२६

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/०१/२०२६ ते दिनांक ३१/०३/२०२६६ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस निरिक्षक (गुन्हे), पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या ०६ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

(डॉ. प्रविण मुंढे) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, मुंबई

Scanned with CamScanner

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - ०४ /०५/२०२६

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेशन केस क्र. ७८२/१९९८<br>कोर्ट नं. ३६<br>मा. न्यायाधीश<br>श्री. सुरेखा सिन्हा | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ११९/१९९८, कलम ४९८(अ), ३०६ भा.दं.वि | ०७/०८/१९९८ | २०/०१/२०२६ | १. आरोपीने बळीत पिडीतेला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त केले हे न्यायालयामध्ये सिध्द झाले नाही.<br>२. सदर घटनेमध्ये साक्षीदार बळीत पिडीतेचे सख्ये भाऊ होते. त्यांनी न्यायालयात साक्ष दिली की त्यांची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही.<br>३. साक्षीदार जे पिडीत बळीतेचे सख्ये भाऊ त्यांनी न्यायालयात सांगितले की त्यांना सदर प्रकरणाची पुढील कारवाई करायची नाही.<br>४. सदर आरोपीवरील आरोपाबाबत स्वतंत्र साक्षीदारांचा कोणताही पुरावा नाही.<br>**एकंदरीत सदर गुन्हयातील साक्षीदार फितूर झाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | नाही | - | - |
| २ | सेशन केस क्र. ४३३/२०१८<br>कोर्ट नं. ५८<br>मा. न्यायाधीश<br>उमेश सोरटे | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ५२/२०१८, कलम ३५३, ५०४, ५०६(२) भादवी सह कलम ८५ महाराष्ट्र प्रतिबंध कायदा | २६/०८/२०१९ | १७/०२/२०२६ | १. सदर केसमधील साक्षीदार फितूर झाले.<br>२. सदर गुन्हयातील माहिती देणारे साक्षीदार हे कर्तव्यावर हजर होते हे सिध्द करणारे कोणतेही कागदोपत्री पुरावे घेतलेले नाहीत.<br>३. सदर गुन्हयामध्ये आरोपीची वैद्यकिय तपासणी केली नाही.<br>४. सदर गुन्हयामध्ये दुखापत केल्याचे कोणतेही पुरावे घेतलेले नाहीत.<br>५. सार्वजनिक ठिकाणी आरोपीने मदयपान केल्याचा कोणताही पुरावा न्यायालयात सिध्द झाला नाही.<br>**एकंदरीत आरोपीवर लावण्यात आलेल्या आरोपांबाबत पुरावा सिध्द करण्यास अभियोक्ता पक्ष अपयशी ठरले आहे. तसेच साक्षीदार फितून झाल्याने व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | नाही. | - | - |
| ३ | सेशन केस क्र. १०/२०२२<br>कोर्ट नं. १९<br>न्यायाधीश<br>एस.एस. अडकर | **मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ०५/२०२१, कलम ३०२ भा.दं.वि. | ०४/०१/२०२२ | ०९/०१/२०२६ | १. सदर केसमध्ये साक्षीदारांच्या जबानीत अनेक विसंगती आढळून आली आहे.<br>२. सदर केसमध्ये साक्षीदार फितूर झाले आहेत.<br>३. सदर केसमध्ये उलटतपासणी मध्ये डॉक्टरांनी कबुल केले की, मृताच्या शरिरावर आढळलेली बाहय जखम ही कठीण पृष्ठभागावर पडल्यामुळे सुध्दा होवू शकते.<br>४. साक्षीदारांनी न्यायालयामध्ये सांगितले की सदर बाबूवर सिल नव्हते.<br>५. सदर केसमध्ये साक्षीदारांनी दिलेली साक्ष विश्वसनिय नव्हती त्यामुळे पुरावा अविश्वसनिय ठरला.<br>**एकंदरीत सदर केसमध्ये साक्षीदार फितूर झाल्यामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | नाही | नाही. | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सेशन केस क्र. ६६९/१९९३<br><br>कोर्ट नं. १०<br>मा. न्यायाधीश<br>अविनाश कुलकर्णी | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ०५/१९९३,<br>कलम ३५३, ३७९, ५०४<br>भा.दं.वि | ०४/०१/२०२५ | २८/०१/२०२६ | १. फिर्यादी पक्ष न्यायालयासमोर कोणताही साक्षीदार हजर करू शकला नाही.<br>२. आरोपीवरील आरोपी सिध्द करण्यासाठी कागदोपत्री पुराव्याची नोंद अपुरी आहे.<br>३. आरोपीला कथीत गुन्हयाशी जोडणारा कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नाही.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपीस फायदा मिळून आरोपी दोषमुक्त झाला आहे. | होय.<br>पोउनि टोंबरे व सपोनि शिरोळे कफ परेड पो. ठाणे | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर |
| ५ | सेशन केस क्र. ५६९/२०२८<br><br>कोर्ट नं. ३६<br>मा. न्यायाधीश<br>श्री. सुरेखा सिन्हा | **मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ०६/२०१८,<br>कलम ३६३, ३७६ भादवि सह ४, ८, १२ पोक्सो ॲक्ट | २२/१०/२०१८ | ०३/०१/२०२६ | १. सदर केसमध्ये पिडीत मुलीने कबूल केले की तिचे आरोपीसोबत प्रेम संबंध आहेत.<br>२. सदर पिडीत मुलीचा जन्म तारखेचा पुरावा मिळून आलेला नाही.<br>३. पिडीत मुलीच्या वडीलांना सुध्दा तिच्या जन्मतारखेची माहिती नव्हती.<br>४. पिडीत मुलीने सांगितले की ती आरोपीसोबत गेली होती आणि तिने आरोपीसोबत लग्न केले ती आरोपीसोबत आनंदाने राहत आहे.<br>५. पिडीत मुलीच्या जन्मतारखेचा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात सादर केला नाही.<br>६. सदर मुलगी अल्पवयीन होती ती १८ वर्षापेक्षा कमी होती हे न्यायालयात सिध्द झाले नाही.<br>७. आरोपीने पिडीत मुलीला तिच्या आई वडीलांच्या ताब्यातून जबरदस्तीने घेवून गेले हे सिध्द झाले नाही.<br>८. आरोपीने पिडीत मुलीवर बलात्कार केला हे सिध्द झाले नाही.<br>एकंदरीत तपासी अधिकारी यांनी तपास योग्य न केल्याने पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | होय.<br>सपोनि विनायक देसूरे मरीन ड्राईव्ह पो. ठाणे | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर |
| ६ | सेशन केस क्र. २३६/१९८७<br><br>कोर्ट नं. २७<br>न्यायाधीश<br>एम.बी. ओझा | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ००/१९८६,<br>कलम ३९२, ३९४, ३९७<br>भा.दं.वि. | १८/०२/१९८७ | ०९/०१/२०२६ | ६. सदर गुन्हयातील साक्षीदार नं. १ याने कबुल केले की त्याला कोणतीही दुखापत झाली नाही.<br>७. आरोपीने चोरलेले एच.एम.टी. घडयाळ व टॅप रेकॉर्ड हे फिर्यादी साक्षीदार यांचेच आहे हे सिध्द करण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयासमोर सादर केला नाही.<br>८. सदर केसच्या ट्रायल एक्झामिनेशन मध्ये अनेक विसंगती आढळून आली आहे.<br>एकंदरीत सदर केसमध्ये पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे. | नाही | नाही. |

Scanned with CamScanner